www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११२ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१७ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# श्रीराम भक्तीचा विश्वविक्रम प्रस्थापित करण्यासाठी सज्ज व्हा-ना.मुनगंटीवार

## २० जानेवारीला श्रीराम नामस्मरणाच्या 'गिनेस' रेकॉर्डसाठी जय्यत तयारी

## अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त तीन दिवस भक्तीचा महोत्सव





**पंढरपूरमध्ये संकीर्तन सभागृह**

जगातील एकमेव असे संकीर्तन सभागृह पंढरपुरात विठ्ठलाच्या चरणी अर्पण करण्याचे भाग्य मला लाभत आहे. चित्रपटाच्या मल्टिप्लेक्सप्रमाणे कीर्तनाचे मल्टिप्लेक्स साकारले जाणार आहे, असे ना. मुनगंटीवार म्हणाले. भीमाशंकर येथील शिव मंदिरात जाण्यासाठी ज्येष्ठांना, दिव्यांग बांधवांना त्रास व्हायचा. आता शंभर कोटी रुपये खर्च करून तिथे भाविकांची सोय होत आहे. त्याचप्रमाणे शिखर शिंगणापूरमधील महादेवाच्या पिंडावर वाहण्यासाठी बेलाची पाने मिळायची नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे मंदिर आहे. या गावात मी १२०० हून अधिक बेलाची झाडे लावली. आज बेलाच्या पानांनी गाभारा भरून जाईल एवढी झाडे याठिकाणी वाढली आहेत. तेथील संत मंडळी मला गेल्या आठवड्यात पुण्यात येऊन भेटली आणि आशीर्वाद दिले, याचाही ना. मुनगंटीवार यांनी उल्लेख केला.

**चंद्रपूरकर असण्याचा आशीर्वाद**

माझ्याकडे शांतीकुंजमधून गायत्री परिवाराचे प्रमुख डॉ. प्रणव पंड्या, डॉ. चिन्मय पंड्या मुंबईत भेटायला आले. या बैठकीत मुंबईत अश्वमेध यज्ञ करण्याचा निर्णय झाला. सिडकोच्या सव्वाशे एकर जागेत २१ ते २७ जानेवारी या कालावधीत हा कार्यक्रम करण्याचे ठरले. जागेचे सव्वादोन कोटी रुपयांचे भाडेदेखील मुख्यमंत्र्यांनी माफ केला. पण योगायोग असा की, श्रीरामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी २२ जानेवारीचा दिवस निश्चित झाला. त्यामुळे आता २१ फेब्रुवारीला हा यज्ञ सुरू होईल. यासाठी जगभरातील गायत्री परिवाराचे हजारो लोक मुंबईत येतील. २ लक्ष फुटाचे १४ मंडप इथे असतील. प्राणप्रतिष्ठेनंतर यज्ञाचे आयोजन करण्याचे भाग्य आपल्याला लाभत आहे, हा चंद्रपूरकर असण्याचा आशीर्वाद आहे, अशा भावना ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

**ज्योत प्रज्वलित करण्याचा मान**

पहिली रामज्योत प्रज्वलित करण्याचा मान वाल्मिकी समाजाचे शशी लखन सरवाम यांना मिळणार आहे. त्यानंतर दुसरी ज्योत केवट भोई समाजाच्या आशाताई दाते, तिसरी मुस्लीम समाजाच्या वतीने चांद पाशा सय्यद, चौथी अनुसूचित जातीच्या प्रियंका थूल, पाचवी आदिवासी समाजाच्या गीता गेडाम, सहावी शीख समाजाच्या वतीने बलजीत कौर बसरा प्रज्वलित करतील. त्यानंतर सर्वांनी ज्योत प्रज्वलित केल्यावर लाईट्स बंद होतील आणि नयनरम्य दृष्य तयार होईल, असे ते म्हणाले.

**२२ जानेवारीला २० चौकांमध्ये भजन**

अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या दिवशी म्हणजेच २२ जानेवारीला चंद्रपूर, मूल, बल्लारपूर, पोंभूर्णा याठिकाणी २० चौकांमध्ये श्रीराम भजनाचे आयोजन होणार आहे. प्राणप्रतिष्ठेचा आनंद सोहळा आपण सारे सभागृहात भव्य स्क्रीनवर बघून हा सोहळा हृदयात साठवायचा आहे. तिन्ही दिवस जिल्ह्यामध्ये स्पिकरवर रामधून वाजत राहणार आहे, अशी माहितीही ना. मुनगंटीवार यांनी दिली.

**नेत्रदीपक आतषबाजी**

२२ जानेवारीला सायंकाळी क्लब ग्राऊंडला दिडशे ते दोनशे कलावंत रामकथेतील नाट्य, गीतरामायण आणि छोटे प्रसंग सादर करतील. रात्री ९ पर्यंत हा कार्यक्रम होईल आणि त्यानंतर नेत्रदीपक आतषबाजी होईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रभू श्रीरामाच्या नाम स्मरणाचा जागतिक विक्रम प्रस्थापित करून रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी अनोखी भक्ती समर्पित करण्यासाठी चंद्रपूरकरांनी सज्ज व्हावे, असे आवाहन पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये एक अनोखी नोंद करून चंद्रपूरचे नाव जागतिक विक्रमामध्ये कायमस्वरुपी प्रस्थापित होईल, असा विश्वासही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केला.

राम मंदिर प्राणप्रतिष्ठा दीप महोत्सव महायज्ञ अभ्यासवर्ग चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आला यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, संतश्री मनीषजी महाराज, गिरीश चांडक, मनोज सिंघवी, गोपाल मुंधडा, डॉ.शैलेंद्र शुक्ला, शैलेश बागला, चंद्रशेखर अल्लेवार, सुभाष कासनगोट्टुवार, मधुसुदन रुंगठा, हर्षवर्धन सिंघवी, चकोरसिंग बसरा, योगेश भंडारी, मिनाताई देशकर, रामकिशोर सारडा, अमल पोतदार, रामजिवन परमार, विनोद तिवारी, दिलीप भंडारी, स्मिता रेभनकर, बंडू धोत्रे, हेमंत सिंघवी, वासूदेव राठोड, कुशल नागोसे, अंत्याजी ढवस, आदी मान्यवर उपस्थित होते.अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने चंद्रपूर जिल्ह्यात तीन दिवस भक्तीचा महोत्सव रंगणार आहे. त्यानिमित्ताने ना. सुधीर मुनगंटीवार यांनी नागरिकांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'चंद्रपूरमधून अयोध्येतील मंदिराच्या गर्भगृहापासून सर्व लाकडी कामांसाठी काष्ठ पाठविण्यात आले. त्यासाठी देवानेच आपली निवड केली आहे. कारण देहराडूनमध्ये जगभरातील लाकडांचे संशोधन झाले तेव्हा आपलेच काष्ठ सर्वोत्तम असल्याचे सिद्ध झाले. अयोध्येतील मंदिर ट्रस्टचे सचिव चंपतराय यांनी लेखी पत्राद्वारे तशी पावती दिली. अशा परिस्थितीत अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जाण्याची माझी इच्छा होती, पण मी एकटाच जाऊ शकलो असतो आणि चंद्रपूर जिल्हयातील प्रभु श्रीराम भक्त इथेच राहिले असते. त्यामुळे अयोध्येला जाण्यापूर्वी शेकडो रामभक्तांसोबत चंद्रपूरमध्ये 'सियावर रामचंद्र की जय' हा रेकॉर्ड करण्याचा निर्णय घेतला.' २० जानेवारीला सायंकाळी ५ वाजता चांदा क्लब ग्राऊंडवर श्रीराम नामस्मरणाच्या गिनेस वर्ल्ड रेकॉर्डला गवसणी घालण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. 'या कार्यक्रमासाठी 'गिनेस'ने २०० अटी आणि नियम टाकून दिले आहेत. त्याचे भान आपल्याला ठेवायचे आहे. त्याचे प्रशिक्षण तुम्हाला मिळणारच आहे. कोणते वस्त्र परिधान करायचे, हे देखील ठरले आहे. एकसूत्रता दिसावी म्हणून महिलांना साडी आणि पुरुषांना शर्ट दिला जाणार आहे. हा कार्यक्रम झाल्यानंतर चांदा क्लब मैदानावर शिस्तबद्ध रीतीने अंथरलेल्या हजारो पणत्यांच्या सहाय्याने 'सियावर रामचंद्र की जय' हा अकरा अक्षरी मंत्र लिहिणार आहेत; हजारो पणत्यांनी सजवलेले हे भव्यदिव्य रामनाम आकाशातून अविस्मरणीय दिसणार आहे,' असे ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. २१ जानेवारीला सकाळी ११ वाजता गिनेसच्या वतीने प्रमाणपत्र प्रदान करण्याचा सोहळा होईल. यावेळी बंगाली समाजाच्या भगिनी शंखनाद करतील. प्रमाणपत्र स्वीकारल्यानंतर सभागृहाच्या बाहेर ढोलताशाच्या गजरात जल्लोष होणार आहे असेही ते म्हणाले. २० जानेवारीला 'एक्स'वर 'सियावर रामचंद्र की जय' हा जगामध्ये पहिल्या क्रमांकाचा ट्रेंड राहील यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी केले. रामायणात उल्लेख असलेले जटायू अर्थात गिधाड संवर्धनाच्या दृष्टीने ताडोबा जंगलातील झरी परिसरात मुक्त करण्यात येणार असल्याची माहिती ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी दिली. २१ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता झरी येथे हा कार्यक्रम होईल. सायंकाळी ६ वाजता चांदा क्लब मैदानावर ज्येष्ठ अभिनेते पुनित इस्सार 'रामनाट्य' सादर करणार आहेत.

## पुलगावचे दोन युवक पोहोचले अयोध्येला पायी

**पुलगाव । प्रतिनिधी**

सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम मनुष्य मात्रावर आपो आपच होत असतो. देशभर सुरू असलेल्या राममय वातावरणाचा परिणाम पुलगावच्या दोन युवकांवर झाला. त्यांनी निश्चय केला की आपण काहीच अयोध्येला प्रयाण करावे. त्यांनी तयारी केलीव निघाले अयोध्येच्या रस्त्याने आणि पाहता पाहता अयोध्येला पायी पोहोचले सुद्धा.




पुलगावच्या हिंगणघाट फैल भागात राहणारा पंकज हरदयाल माहोर ( वय २४) व गांधी चौक परिसरामध्ये राहणारा अनिकेत विजयंत जोरिगवार (वय २२) हे दोन युवक २जानेवारी २४ ला फक्त कुटुंबीयांना सांगून अयोध्याकडे रवाना झाले. प्रवासामध्ये सहकार्यासाठी ओळखीचे पत्र लागेल, म्हणून भाजपा नेते संजय गाते यांच्या माध्यमातून खासदार रामदास तडस त्यांचे ओळखपत्र सोबत ठेवले. प्रवास करीत असतानाच त्यांच्याच प्रमाणे पायी प्रवास करणारे छत्तीसगडचे दोन योग त्यांना भेटले. त्यामुळे प्रवास सुकर झाला.मजल दर मजल करत अखेर अयोध्या गाठले. प्रवास करताना त्यांच्या उत्साह मार्गात भेटणाऱ्या रामभक्त व दिवसेंदिवस राममय होणाऱ्या वातावरणामुळे वाढतच चालला होता. अयोध्या पोचल्यावर तर त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. राम लल्ला चे दर्शन घेऊनच परतण्याचा त्यांचा निर्धार आहे.

## अमरावती येथे माजी सैनिक संमेलन

**पुलगाव । प्रतिनिधी**

दि.१४जानेवारी २४ रोजी, ८व्या आर्मी वेटरन्स डे निमित्त, जोग स्टेडियम, अमरावती येथे स्टेशन हेडक्वार्टर पुलगाव तर्फे माजी सैनिक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अमरावती, यवतमाळ,वासीम, वर्धा व अकोला जिल्ह्यातील सुमारे ११८० माजी सैनिक, त्यांचे आश्रित व शूर महिला सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मेजर जनरल एसके विद्यार्थी, एव्हीएसएम, एसएम आणि ब्रिगेडियर कौशलेश पंघल, स्टेशन कमांडर, मिलिटरी स्टेशन पुलगाव हे उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान उपस्थित अधिकाऱ्यांनी रॅलीत आलेल्या माजी सैनिक, त्यांच्या आश्रित व धाडसी महिलांच्या समस्या ऐकून घेतल्या व त्या सोडवण्याचा योग्य तो प्रयत्न केला. तसेच कार्यक्रमा दरम्यान रेकॉर्ड ऑफिस, आर्मी रिक्रूटमेंट ऑफिस नागपूर, स्पर्श काउंटर, मेडिकल आणि डेंटल काउंटर आणि सी एस डी काउंटर अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या, ज्याचा सर्वांनी लाभ घेतला. कार्यक्रमा दरम्यान उपस्थित शूर महिला व शूर मातांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते स्पर्श काउंटर ज्यामध्ये माजी सैनिकांच्या पेन्शन संबंधी समस्यांचे त्वरित निराकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी तीन वेळा भारत माता की जय चा जयघोष केला. स्टेशन हेड क्वार्टर पुलगाव, एसपी (ग्रामीण) अमरावती, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती आणि अमरावती महानगरपालिका यांच्या प्रयत्नाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# बारावीच्या विद्यार्थ्यांना देणार राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे धडे

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत प्रशिक्षकांचे सोमनाथ येथे एकदिवसीय प्रशिक्षण संपन्न

**गडचिरोली । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची विद्यार्थी आणि शिक्षकांना योग्य माहिती व्हावी, या धोरणाबाबत त्यांच्या मनात असलेल्या प्रश्नांची उकल व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी गोंडवाना विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे.

गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती देणार आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रशिक्षकांची निवड करण्यात आली आहे. प्रशिक्षकांचे एकदिवसीय प्रशिक्षण नुकतेच चंद्रपूर जिल्ह्यातील सोमनाथ येथे पार पडले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी बोलताना आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी म्हणाले की, बारावी नंतर काय ? असा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांच्या मनात असतो. पुढे पदवीच्या प्रथम वर्षात येऊन विद्यार्थी संभ्रमात असतात की आता काय करायचे?, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणणानुसार पुढचे शिक्षण होणार आहे म्हणजे नक्की काय होणार आहे, याबाबत त्यांच्या मनात स्पष्टता नाही. हीच स्पष्टता आणून देणे हा उद्देश गोंडवाना विद्यापीठाचा आहे. यासाठीच विद्यापीठ आणि सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील काही शिक्षकांना प्रशिक्षण देऊन त्यांना इतर महाविद्यालयातील विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. सध्या मान्यताप्राप्त महाविद्यालयातील २० टक्के विद्यार्थी कमी झाले आहेत. अनेक विद्यार्थी बारावीनंतर शिक्षण सोडून देतात तर काही विद्यार्थी इतर जिल्ह्यात जातात. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थी पुढचे शिक्षण




कसे घेतील आणि तेही आपल्याचं जिल्ह्यात यासाठी प्रयत्न केले पाहिजे. गोंडवाना विद्यापीठाच्या परीक्षेत्रात येणाऱ्या विद्यार्थ्यांना जर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून सांगितले तर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. रोजगाराचे स्वरूप बदलत आहे, हे विद्यार्थ्यांना सांगावे लागेल. एका विशिष्ट जॉबच्या मागे न लागता आऊट ऑफ बॉक्स शोधावे लागेल.हळूहळू त्याचा कल सामाजिक उद्योजकाकडे न्यायला पाहिजे त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. याचे मार्गदर्शन या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळेल. सोबतच 'विकसित भारत २०४७' ही केंद्र शासनाची संकल्पना आहे. २०४७ मध्ये भारत जगात पाहिल्या क्रमांकाचा देश व्हावा, यासाठी सुद्धा या विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे नेपच्या माध्यमातून हे शक्य करण्यासाठी प्रयत्न केला जात असल्याचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी सांगितले. यावेळी अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे यांनी सांगितले की, नेप च्या अंमलबजावणी संदर्भात गोंडवाना विद्यापीठ इतर विद्यापीठाच्या पुढे आहे. दोन्ही जिल्ह्यातील बारावीच्या विद्यार्थ्यांना नेपच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे हा मुख्य उद्देश आहे. सर्वानीमिळून यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास संचालक डॉ. प्रिया गेडाम यांनी विद्यार्थी विकासच्या माध्यमातून चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ.धनराज पाटील यांनी 'नॅक' संदर्भात माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यापीठाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे समन्वयक डॉ. विवेक जोशी यांनी केले. संचालन स. प्रा. विकास चित्ते यांनी तर आभार स. प्रा. केशव बैरागी यांनी मानले.

# मतदार राजा जागा हो!

**दोन दिवसापूर्वी आमचे एक मित्र वरोरा येथे गेले होते. मी सहज त्यांना तिथे जाण्याचे कारण विचारले. बोलताना त्यांनी सांगितले की, आज आमची निवडणूक आयोगाची बैठक होती. लोकांमध्ये निवडणुकीच्या संदर्भात जनजागृती करण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगण्यात आले. खरं म्हणजे निवडणुकीची पूर्वतयारी करणे हे प्रशासनाचे काम असले तरी एक जागरूक नागरिक म्हणून आपलेही काही कर्तव्य नाही का? असा विचार मनामध्ये आला आणि त्या चिंतनातून आजच्या फेरफटकासाठी हा लेख तयार झाला. निवडणुकीप्रति शासन आणि शासनाचे अधिकारी जेवढे जागृक असतात तेवढेच आपण मतदारांनीही जर जागरूकता दाखविली तर नक्कीच निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढेल आणि ही लोकशाही खऱ्या अर्थाने निकोप होईल असे वाटते.**




भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. जनतेचे राज्य ही संकल्पना स्वीकारून जनतेने निवडून दिलेल्या जनप्रतिनिधींच्या माध्यमातून आपले राज्य चालविले जाते. देशाला जर प्रगतीवर न्यायचे असेल तर सक्षम लोकप्रतिनिधी निवडून देणे गरजेचे असते. त्यासाठी मतदारांनी निर्भयपणे आणि विचारपूर्वक जर मतदान केले तर निश्चितच सभागृहामध्ये लायक प्रतिनिधी निवडून जातील. त्यासाठी मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी शासनाच्यावतीने नवनवीन विविध प्रकारच्या प्रक्रिया राबविल्या जातात. निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा कणा आहे. मतपेटीच्या माध्यमातून योग्य प्रतिनिधी निवडणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष मतदान करण्याच्या वेळी कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता आणि दबावाला बळी न पडता या देशातील प्रत्येक नागरिकांनी आपल्या हक्काचा मतदानाचा अधिकार बजावलाच पाहिजे. मतदारांनी मतदार म्हणून आपल्या अधिकारांसंदर्भात जागरूक राहिल्यास देशातील लोकशाही व्यवस्था अधिक मजबूत आणि सक्षम होऊ शकेल.दुर्दैवाने आपल्या देशातील लोकांना आपली अधिकार माहिती आहे परंतु कर्तव्ये नाही. अजूनही अपवाद वगळता अनेक लोकांमध्ये मतदानाप्रती ज्या पद्धतीने जागरूकता पाहिजे तशी दिसत नाही हे दुर्दैवाने बोलावेसे वाटते.

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी अनेक शासकीय व निमशासकीय कार्यालयांना त्यादिवशी मतदानासाठी सुट्टी दिलेली असते. उद्देश हाच की मतदान करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणामध्ये जावे आणि मतदान करावे. परंतु दुर्दैवाने अनेक लोकांमध्ये मतदानाच्या दिवशीची सुट्टी म्हणजे आनंद उपभोगण्यासाठी मिळालेली सार्वजनिक रजा अशी ही मानसिकता झालेली आहे. अनेक दीड शहाणे लोक या दिलेल्या सुट्टीचा गैरउपयोग करत मतदान केंद्राकडे पावले वळविण्याऐवजी मनोरंजन स्थळांकडे आपली पावले वळवितात. कौटुंबिक सहली काढतात, देवदर्शनाला जातात, काही लोकं तर अक्षरशः घरी झोपतात. हे या देशाचे दुर्दैव आहे की, जिथे लोकांनी स्वतःहून मतदान करायला जायला पाहिजे तिथे लोकांना मतदानासाठी सक्ती करावी लागते. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत तर अनेक ठिकाणी ५०% च्यावर मतदानाचा टक्का वाढत नाही. कुठे ५०% कुठे ६०% टक्के मतदान झाल्याचे आपण बऱ्याचदा ऐकतो आणि वाचतो. दुर्दैवाने १०० पैकी ४०% लोक जर मतदान करत नसेल तर त्या देशामध्ये खरोखरच लोकशाही आहे का? असे म्हणायची आणि डोक्यावर हात मारण्याची पाळी आपल्यावर येते.

जेव्हा तुम्हाला आपले लोकप्रतिनिधी म्हणजे सरकार निवडून द्यायची संधी असते तेव्हा आपण तिकडे दुर्लक्ष करतो. चुकीची व्यक्ती जर निवडून आली तर आपण त्यांच्या नावाने ५ वर्षे स्वतःच्या कपाळावर आठ्या मारत असतो. खरं म्हणजे ज्या लोकांनी मतदान केले नाही अशा लोकांना सरकारबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार मुळीच नाही. कारण तुम्ही तुमच्या राष्ट्रीय कर्तव्यापासून स्वतःला दूर ठेवलेले आहे. याची जाणीव ठेवायला पाहिजे. आपली रोजी रोटी पडू नये म्हणून शासनाने खास सुट्टीची व्यवस्था केली होती. आपण मतदानाचा हक्क बजावण्याऐवजी पर्यटन करायला निघून गेलो होतो. लाज वाटली पाहिजे अशा मनोवृत्तीची. आपण आहोत कोण? करतो काय? आणि वरून आपण शासनाच्या नावाने बोटे मोडतो. जर आपल्याला आपल्या विचाराचे, आपल्या मताचे, आपल्या आचाराचे सरकार पाहिजे असेल तर आपण निश्चितपणे मतदान केले पाहिजे. आपला मतदानाचा अधिकार सक्षमपणे बजावला पाहिजे. मतदानानिमित्त सुट्टी आहे. या सुट्टीचा आनंद उपभोगण्यासाठी कुठेतरी सहल काढूया हे विचार म्हणजे नाकर्तेपणाचा कळस होय. प्रत्येकाने जर ठरवले की मी मतदान करणारच. तर निश्चितपणे एक सक्षम सरकार निवडून आल्याशिवाय राहणार नाही. लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी निवडलेले सरकार नक्कीच येईल. पण अनेक लोक अनेकदा मी एकट्याने मतदान नाही केलं तर काय फरक पडतो? असा विचार करतात आणि दुर्दैवाने चांगल्या सरकारला निवडून येण्यापासून वंचित ठेवतात. यापुढे लोकांनी स्वतः जागरूक राहून जशी असेल तशा परिस्थितीतून आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. या देशातील लोकशाही जशी जमेल तशी बळकट करण्यासाठी आपला खारीचा वाटा उचलला पाहिजे. लोकशाही जगविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत गरजेचे आहे. मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्ये बजावणे होय असे म्हटले तरी वावगे होणार नाही.आपली भारतीय लोकशाही आता परिपक्व झालेली आहे. सत्तरी पार केलेल्या या लोकशाहीत स्वतः मतदारांनी जागरूक राहणे आवश्यक आहे. आपल्याला आपल्या मतदानाचा अधिकार हक्क बजावता येईल यासाठी स्वतःच पुढाकार घेऊन मतदारांनी जागरूक असायला हवे. परंतु दुर्दैवाने मतदानाच्या वेळी मतदार यादीत नावे नसल्याने मतदानाचा अधिकार न बजावता आल्या पावली परतल्याने अनेक मतदारांना मतदानाचा अधिकार बजावता आला नसल्याचे आपण बघितलेले आहे. जेव्हा प्रशासकीय यंत्रणा मतदार याद्या लावून तिथे मतदारांचे नाव आहे की नाही याची खात्री करून घ्यायला सांगतात. तेव्हा अनेक मतदार तिकडे दुर्लक्ष करतात. मतदार यादीत आपले नाव आहे की नाही हे या देशाचा जागृक नागरिक म्हणून बघणे आपले कर्तव्ये आहे. परंतु अनेकांना ते बघण्याचीही सवड नसते. त्या याद्या लावल्याहे अनेकांच्या ध्यानीमनी नसते. परिणामतः वेळेवर अशा निष्काळजी लोकांची गैरसोय होते. त्यांना मतदानाच्या दिवशी मतदानापासून वंचित राहावे लागते. ही नामुष्की जर टाळायची असेल तर मतदारांनी जागृतपणे नियोजित कालावधीमध्ये मतदार यादीत आपले नाव आहे की नाही याची खात्री करून घ्यायला हवी. कारण आता आपण नवखे नागरिक राहीलो नाही. परिपक्व लोकशाहीचे आपण तारक आहो.जनता आहो . मतदार आहो.तेव्हा शासनाने जाणीव करून देण्यापेक्षा आपणच आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून स्वतःच्या नावाची खात्री करून घ्यायला पाहिजे.

१८ वर्षे पूर्ण झालेल्या युवक युवतींना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी नेमका अर्ज कोठे करावा? याची माहिती नसते. त्यांचीही अडचण लक्षात घेऊन शासन अनेक शाळा, महाविद्यालयांमध्ये नोडल अधिकारी नेमून अशा इच्छुक युवक युतीसाठी मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी प्रक्रिया राबवत असतात. तो फायदा घेऊन प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या पाल्यांना मतदार यादीमध्ये नाव नोंदवायला सांगितले पाहिजे. या कामात प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालयांनी आपल्या संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत जास्तीत जास्त युवकांना ती माहिती पोहोचवून नाव नोंदविण्याची प्रक्रिया राबवून नवीन मतदार नोंदणीची संख्या कशी वाढविता येईल या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. ज्यांना संगणक चालवता येतं. त्यांना भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरही नोंदणी संदर्भात सविस्तर माहिती मिळवून घेता येऊ शकते. तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखेतही नोंदणी संदर्भात राबविण्यात येणाऱ्या विविध अभियानांची माहिती मिळू शकते. शासन वर्तमानपत्रे, एनजीओच्या माध्यमातून मतदार नोंदणीसाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून वेळोवेळी अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन मार्गदर्शन करून आपले प्रयत्न करीत असतात.अलीकडे सोशल मीडियाचे युग आहे. इंटरनेट, फेसबुक व व्हाट्सअप सारख्या सोशल मीडियाचा वापर करून लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा चौफेर प्रयत्नांनी मतदार यादीत नवोदित मतदारांची नावे समाविष्ट होऊ शकतात. मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी, रॅली, विविध प्रकारचे आकर्षक स्लोगन या माध्यमातूनही लोकांमध्ये जनजागृती निर्माण करता येते. दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. अतिशय धुमधडाक्यात साजरा होणाऱ्या या दिवसाच्या माध्यमातून मतदार राजाला जागृत करण्याचे काम केले जाते. निकोप, सक्षम व निर्भीड लोकशाहीसाठी स्वतः सर्वांनी एक जागृक नागरिक म्हणून पुढाकार घ्यायला पाहिजे. या निमित्ताने एवढेच सांगावेसे वाटते की, मतदार राजा जागा हो, निकोप लोकशाहीचा धागा हो.

# कुंभार पूजन... एक अनोखा उपक्रम..

**व्यवसायानिमित्त आठ महिन्यांसाठी आपण आपल्या गावापासून लांब असतानाही संक्रांतीच्या दिवशी उच्चशिक्षित, सेवानिवृत्त अधिकारी असणारे आपल्या गावाचे सरपंच त्यांच्या मित्र परिवारासह अचानक आपल्या भेटीसाठी येतात,आपली आस्थेने विचारपूस करतात,चिखल मातीचे भरलेले हात आपल्या हातात घेऊन हस्तांदोलन करून पूजन करतात या घटनेने भारावून जातांना डोळे पाणावलेल्या कुंभार बांधवांच्या जीवनातील अनोखा प्रसंग....**

बारा बलुतेदार पद्धती अस्तित्वात होती तेव्हापासून ते आतापर्यंत कुंभार समाजाला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यू पर्यंत विविध सण समारंभामध्ये व आपल्या दैनंदिन जीवनात कुंभार दादा आपल्याला मातीच्या विविध वस्तू उपलब्ध करत आले आहेत....



तुषार अनिल विसपुते,
कानळदा ता.जि.जळगाव
९६७३०३७२६५

जसे की लग्नसमारंभाच्या सुरुवातीला गृह पूजनासाठी नवीन माठ, दिवाळीच्या सणाला पणत्या असो की महालक्ष्मी, बैलपोळ्याच्या वेळेस पूजनासाठी मातीचे बैल, पूर्वीच्या काळापासून ते आतापर्यंत स्वयंपाकासाठी लागणारी मातीची चूल,गार पाणी पिण्यासाठी लागणारा माठ, पूर्वीच्या काळी लहान मुलांना खेळण्यासाठी मातीची छोटी छोटी खेळणी व आता सुद्धा आपण ज्या घरांमध्ये राहतो त्या घरासाठी लागणारी महत्त्वपूर्ण वीट कुंभार दादाच निर्मिती करतात. आणि शेवटी आपण हे जग सोडून जातो तेव्हा अंत्यसंस्काराच्या वेळी सुद्धा कुंभार दादाकडून आणलेल्या नवीन छोट्या मटक्यातूनच पाणी देऊन आपल्या जीवनातील शेवटचा संस्कारही केला जातो...

मात्र या सर्व गोष्टींची निर्मिती करताना पूर्वीपासून ते आतापर्यंत सुद्धा उन्हातान्हात खूप कष्टाने आपले कुंभार बांधव या गोष्टी आपल्याला उपलब्ध करून देतात. यासाठी कुंभार बांधवांचे आपण कुठेतरी ऋणनिर्देश करणे आवश्यक असते.त्यासाठी संक्रांतीला कुंभार पूजनाची प्रथा आहे...

जळगाव जिल्ह्यातील कानळदा गावामध्ये कुंभार बांधवांची १०० च्या वर घरे आहेत. गावामध्ये गुण्यागोविंदाने राहून ही मंडळी गावकऱ्यांना व परिसरातील नागरिकांना लागणाऱ्या वस्तू तर उपलब्ध करूनच देतात. शिवाय आपल्या उदरनिर्वाहासाठी आठ महिने बाहेरगावी जावून शेत शिवारात राहत खूप कष्टाने उन्हातान्हात,थंडी वाऱ्यात राहून घरांसाठी लागणाऱ्या मातीची विट निर्मितीचा व्यवसायही करतात....

कानळदा गावातील अशा कष्टकरी कुंभार बांधवांच्या कामाला प्रोत्साहन देऊन त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी कानळदा सरपंच तथा सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक श्री पुंडलिक तुळशीराम सपकाळे व त्यांच्या सहकार्यांनी मकर संक्रांतीच्या दिवशी कुंभार पूजनाचा कार्यक्रम आयोजित केला. यावेळी आपल्या गावातील श्री.ईश्वर भागवत न्हावकर ( कुंभार ),श्री.निंबा कोंडू न्हावकर,श्री.सुधाकर भागवत न्हावकर, श्री.प्रल्हाद पांडू न्हावकर ,श्री.गोकुळ शामराव न्हावकर,श्री.रवींद्र पांडू न्हावकर, श्री.पितांबर श्रावण न्हावकर,श्री.बाळू तानकु न्हावकर, श्री.मधुकर भागवत न्हावकर,श्री.जितेंद्र सुकलाल न्हावकर,श्री.ज्ञानेश्वर पूनमचंद न्हावकर, श्री.संजय भागाची सिल्लोडे, श्री.भोला नामदेव न्हावकर,श्री.अनिल भागाजी सिल्लोडे, श्री.बुधा प्रल्हाद न्हावकर, श्री.चावदस कोंडू न्हावकर, श्री.जगन दगडू न्हावकर,श्री.मुरलीधर लक्ष्मण न्हावकर, श्री.मधुकर श्रावण न्हावकर, श्री.ज्ञानेश्वर एकनाथ न्हावकर या कुंभार बांधवांची कुटूंब ज्या ज्या गावाला वीट भट्टी लावण्यासाठी गेलेले आहेत, त्या त्या गावाला प्रत्यक्ष जाऊन त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना भेट देऊन त्यांची विचारपूस करत त्यांचे औक्षण करण्यात आले. त्यावेळी कुटुंब प्रमुखाला रुमाल,टोपी देऊन तीळ,गुळाचा लाडू भरवून त्यांचे पूजन करत त्यांच्या व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या....

यावेळी सरपंच श्री.पुंडलिक सपकाळे यांच्यासोबत कानळदा ग्रामपंचायत सदस्य श्री. भिकनभाऊ सपकाळे, ग्रामपंचायत सदस्य किशोर दादा सपकाळे, ग्रामपंचायत सदस्य एकनाथ महाराज सपकाळे माजी ग्रामपंचायत सदस्य भैय्यासाहेब प्रमोद चव्हाण, माजी ग्रामपंचायत सदस्य श्री.अनिल भाऊ सपकाळे इच्छाराम काका सपकाळे व मित्रपरिवार उपस्थित होते.

आपल्या गावातील सरपंच त्यांच्या मित्र परिवारासह अचानक आपल्या भेटीसाठी येतात,आपली आस्थेने विचारपूस करतात,चिखल मातीचे भरलेले हात आपल्या हातात घेऊन हस्तांदोलन करून पूजन करतात. या घटनेने सर्व कुंभार बांधव भारावून जातात. अशा प्रसंगाचा मलाही साक्षीदार होता आले हे माझे भाग्यच आहे...

# शिवसेनेचे दोन्ही गट नार्वेकरांविरुद्ध कोर्टात:आमदार अपात्रतेची मागणी



**मुंबई**–शिवसेनेच्या एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे या दोन्ही गटातील आमदारांना पात्र ठरवणारे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या १० जानेवारीच्या निकालास दोन्ही गटांनी कोर्टात आव्हान दिले आहे. आपण काढलेला 'व्हीप' अध्यक्षांनी अधिकृत ठरवला. मात्र तो डावलणाऱ्या ठाकरे गटाच्या १४ आमदारांना अपात्र ठरवले नाही. हा निर्णय अयोग्य असल्याचा आरोप करत शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावर २२ जानेवारीला सुनावणी होईल.तर शिवसेना पक्षाची २०१८ ची घटना अनधिकृत ठरवत 'पक्षप्रमुख' पदावर आक्षेप घेणाऱ्या अध्यक्षांच्या निर्णयाला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. शिंदे गटाला पात्र ठरवण्याचा नार्वेकरांचा निर्णय न्यायालयाच्या निर्देशांचा अवमान करणारा व संविधानाची पायमल्ली करणारा आहे. त्यांचा निर्णय रद्द करून शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवावे, अशी मागणी केली आहे. ठाकरे गटाच्या याचिकेवर सुनावणीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही.दुसरीकडे, अॅड. राहूल नार्वेकर मात्र आपल्या निर्णयावर ठाम आहेत. 'मी दिलेला निर्णय पूर्णपणे न्यायाला धरुन आहे. यात सर्वोच्च न्यायालयांच्या निर्देशांचे उल्लंघन झालेले नाही. कारण न्यायालयाने शिंदे गटाचे भरत गोगावले यांचे प्रतोदपद बेकायदा ठरवलेले नव्हते. तसेच मला नेतृत्व, बहुमत व पक्षघटनेच्या आधारे खरी शिवसेना कुणाची हे ठरवण्यास सांगितले होते. मी निवडणूक आयोगाच्या हवाल्याने पक्ष कुणाचा ते ठरवले.'दरम्यान, विधिमंडळ व निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर शिवसेनेच्या दोन्ही गटातील लढाई आता पुन्हा न्यायालयात जुंपणार असल्याचे दिसून येते.

## सच्ची मीडिया का ये डर अच्छा है

# रोहित पवार यांचे मुख्यमंत्र्यांच्या दावौस दौऱ्यावरुन खोचक ट्विट

**मुंबई**–परदेश दौऱ्यात होणारी उधळपट्टी पत्रकार परिषद घेऊन उघडकीस आणताच आज दावोस दौऱ्यात जाणाऱ्या अनेकांच्या स्वप्नावर पाणी फिरले काहींना हात चोळत घरी बसावे लागले तर काहींच्या खिशाला झळ बसल्याने त्यांच्या पोटात नक्कीच कळ आली असणार असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी लगावला आहे.दरम्यान रोहित पवार म्हणाले की, दावोस दौऱ्यासाठी ३४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर मुख्यमंत्र्यांसोबत जे लोक या दौऱ्यात जात आहेत. या मधले निर्णायक ठरणारे किती होते, याबाबत आकडेवारी आल्यानंतर बोलू. असे रोहित पवार म्हणाले आहेत.परदेश दौऱ्यात होणारी उधळपट्टी पत्रकार परिषद घेऊन उघडकीस आणताच आज दावोस दौऱ्यात जाणाऱ्या अनेकांच्या स्वप्नावर पाणी फिरले काहींना हात चोळत घरी बसावे लागले तर काहींच्या खिशाला झळ बसल्याने त्यांच्या पोटात नक्कीच कळ आली



असणार. मात्र यामुळे राज्याच्या तिजोरीवर पडणारा दरोडा वाचल्याचे समाधान काही औरच आहे! यामुळे चखऊ्र ला काही प्रमाणात आर्थिक शिस्त लागली असेल, अशी अपेक्षा करू! सच्ची मिडिया का ये डर अच्छा है! - रोहित पवार यांचे ट्विट चर्चेत आले आहे.दरम्यान तैवान दौऱ्यावरील लोकांसाठी राज्य शासनाने दिवसाला ६० लाख प्रत्येक व्यक्तीवर खर्च केले. दावोस दौऱ्यासाठी ३४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांच्या अभ्यास दौऱ्यासाठी केवळ एक लाख रुपये खर्च केले जातात, यावरुन हे सरकार सर्वसामान्यांचे नसून काही निवडक लोकांचेच आहे का? असा सवालही त्यांनी यापूर्वी बोलताना केला होता.ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दावोस दौऱ्यावर टीका केली होती. फक्त १० लोकांची संमती असताना मुख्यमंत्र्यांसह एकूण ५० लोक जात आहेत. त्यांच्यामध्ये मुख्यमंत्री, मंत्री यांचे पीए, ओएसडी यांचा समावेश आहे. ही जनतेच्या पैशांची उधळपट्टी आहे, असे आदित्य ठाकरेंनी म्हटले आहे.दावोसला जिथे ५-६ लोकांचे काम आहे. तिथे एवढे लोक का घेऊन जाताय? बॅग उचलायला असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला आहे. या ५० लोकात कोणीही बिझनेस मॅन नाही. हा खर्च जरी स्वतः ते करणार असले तरी चए- ला हे माहिती आहे का? मी चए- ला हेच विचारतोय की हे तुम्हाला माहिती आहे का? आणि तुम्ही इतक्या लोकांना परवानगी दिली आहे का? असा प्रश्न आदित्य ठाकरेंनी सवाल केला आहे.

# पुलगावात करमाफी साठी व्यापाऱ्यांचा कडकडीत बंद

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव शहरातील इंदिरा व्यापारी संकुल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुलातील दुकानांवर नगर परिषदने लावलेला कर थकीत झाला. त्यामुळे नगर परिषदेने सक्तीने वसुलीची सुचना दिली. त्यामुळे नगर परिषदेने कर माफ करावा, यासाठी शहरातील व्यापारांनी कडकडीत बंद पाळला.नगर परिषद प्रशासनाच्या चुकीच्या धोरणामुळे गाळेधारकांना सन २००७ पासून कर लागल्यानंतर प्रत्येके वर्षी न.प. द्वारा कर वसुली केली असती तर व्याजापासून मुक्त होऊन गाळे व्यापारी धारकावर एकत्रित १५/१६ वर्षाचे कर व्याजासहित आकारणी होऊन आले नसते. परंतु याउलट प्रशासना द्वारे पुलगाव नगरपरिषद मालकीचे इंदिरा मार्केट जाहीर लिलाव नामामध्ये यांनी करारनाम्यात मालमत्ता कर चा काही उल्लेख झालेला नाही. व्यापाऱ्यांना विश्वासात न घेता सुचना नोटीस ठराव न करता २००७ पासून यांना पंधरा-सोळा वर्षाचे कर एकत्रित पाठवण्यात आले जे असंविधानिक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट मधील व्यापाऱ्यांचे दुकान कधी २००२ ते प्रशासनाच्या सोयीनुसार लिलाव करण्यात आले व व्यापाऱ्यांची दुकाने लांबी रुंदी सारखीच असताना सुद्धा न.प. द्वारा १३ व १३ ला अर्धवट असेसमेंट



झाले. त्यानुसार त्यांच्यावर कर हे समान नसून वेगवेगळ्या स्तरावर विभाजण्यात आले. जे अन्यायकारक आहे. न.प. द्वारा असेसमेंट करून त्यांना समान भाडे व कर करण्यात यावे. . गाळे धारकांना आकारण्यात आलेल्या मालमत्ता कर व्याजाची रक्कम माफ करण्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगर अधिनियम १९६५ मध्ये माफीची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे मालमत्ता कराची वसुली व्याजासह नियमानुसार करण्यात येईल, असे सांगण्यात आले. कायद्याचा पोट कलम ६७ (१) तरतूद दिली आहे. राज्य शासनाच्या हस्तक्षेपाने समस्त व्यापारी यांचा शास्ती कर माफ होऊ शकते,जे की ते त्यांच्या मागण्यानुसार संविधानिक आहे.परंतु राज्य शासन अभय योजना संपूर्ण महाराष्ट्र मध्ये लागू करून त्यामध्ये फक्त महानगरपालिका येथील मोठ्या व्यापाऱ्यांना शास्ती कर मध्ये सवलत देत आहे व गरीब वर्गातील व्यापाऱ्यांना या योजनेपासून बेदखल करून त्यांच्यापासून सक्तीने शास्ती कर वसूल करत आहे. हा आम जनतेवर व्यापारांवर अन्याय नाही का. मोठमोठे उद्योग व्यापारी यांचे कोट्यावधी चे बुडीत कर्ज सरकार द्वारा माफ करण्यात येते तर महाराष्ट्राचा पाठीचा कणा असलेले गरीब छोट्या वर्गातील व्यापाऱ्यांचे शास्ती कर का माफ होत नाही तसेच नगरपालिका स्वतःचा लेखाजोखा वाढवण्याच्या नादामध्ये गरीब वर्गातील व्यापाऱ्यांकडून सक्तीचे शास्ती कर घेत आहे.आजपर्यंत व्यापाऱ्यांनी कित्येकदा तक्रार व नगरसेवक द्वारा ठराव सुद्धा घेण्यात आले. परंतु नगर प्रशासन द्वारा सदर अहवालामध्ये गावातील व्यापारी गरीब वर्गातील असून त्यांच्या दुकानाचे रोजचा आमदनी चा खर्च सुद्धा निघत नाही त्यामुळे त्यांच्या दुकानात मालाची सामग्री पण सुद्धा शास्ती कर आकारण्या इतकी नाही. याकरिता शासनाने यावर दखल घेऊन तोडगा काढून पुलगाव येथील व्यापाऱ्यांचे शास्ती कर माफ करण्यासंबंधी आज पर्यंत नगरपरिषद ते जिल्हाधिकारी कार्यालय ते नगर विकास मंत्रालय मुंबई सदर अहवाल का पाठविण्यात आला नाही.यामधील शासनाचे महसूल मोठ्या प्रमाणात थांबून आहे. यावर दखल घेऊन राज्य शासना द्वारे मार्गदर्शन करण्यात यावे. यासाठी भिम आर्मीच्या नेतृत्वामध्ये पुलगाव व्यापाऱ्यांनी पुलगाव बंद चे आवाहन केले. त्याला सर्वच व्यापारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# सिरोंच्या येथे प्रसिद्ध बालाजी मंदिरात श्रीमाता गोदादेवी व श्रीरंगनाथ स्वामी कल्याण महोत्सव मोठ्या थाटात साजरा

## अहेरी इस्टेट चे राजे तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या हस्ते झाले विधिवत पूजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर, तेलंगणा राज्य सीमेवर असलेल्या सिरोंचा येथे अतिप्राचीन व प्रख्यात बालाजी मंदिरात दरवर्षी प्रमाणे या वर्षीसुद्धा मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर दक्षिणात्य परंपरेनुसार हजारो वऱ्हाडीच्या(भक्तांच्या) साक्षीने,तेलंगणाच्या वेद पंडितांच्या मंत्रोपचाराने,वाजयंत्रीच्या गजराने श्री माता गोदादेवी व श्री रंगनाथ स्वामींचा कल्याण महोत्सव मोठ्या थाटात साजरा झाला.



सिरोंचा येथील बालाजी मंदिरात दरवर्षी श्री माता गोदादेवी व श्रीरंगनाथ स्वामी कल्याण महोत्सव मोठ्या उत्सवात साजरा केला जातो.रोज सकाळी पूजन, आरती, भजन-कीर्तन केले जातात. त्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय होऊन जाते.या कल्याण महोत्सवाला गडचिरोली जिल्ह्यासह तेलंगणा,आंध्रप्रदेश, छत्तीसगड राज्यातील भक्तगण हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून भगवान बालाजीसह श्री माता गोदादेवी व श्रीरंगनाथ स्वामीचे दर्शन घेत असतात.सिरोंचा येथे मोठ्या उत्साहात पार पडलेल्या श्री माता गोदादेवी व श्रीरंगनाथ स्वामी कल्याण महोत्सवाला अहेरी इस्टेटचे राजे तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी विशेष उपस्थिती दर्शवली आणि श्री माता गोदादेवी व श्रीरंगनाथ स्वामी यांचे विधिवत पूजन केले.या कल्याण महोत्सव करीत त्यांच्या कडून ७१०००/- (एकात्तर हजार रुपये) देणगी दिली व श्री माता गोदादेवी व श्री रंगनाथस्वामी कल्याण महोत्सवातील भक्तगणांना महाप्रसादचं वितरण करून आनंद द्विगुणीत केला.यावेळी श्री माता गोदादेवी व श्रीरंगनाथ स्वामी कल्याण महोत्सवाचे पदाधिकारी,वेद पंडित,पुजारी,मोठ्या प्रमाणात बालाजी भक्तगण आणी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते व सिरोंच्या येथील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माहेश्वरी मंडळ पुलगाव तर्फे श्रीमद भागवत कथा

**पुलगाव** – स्थानिय माहेश्वरी मंडळाच्या वतीने १८ ते २४ जानेवारी दरम्यान प. पु. गोवत्स राधाकृष्ण महाराज यांची संगीतमय श्रीमद भागवत कथेचा अलौकिक कार्यक्रम ब्रजधाम साईबाबा मंदिर श्री टॉकीजच्या मागे , पुलगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.



गुरुवार १८जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता मदनमोहन भवन येथून मिरवणूक काढण्यात येणार आहे.ती विविध मार्गाने मार्गक्रमण करीत कथास्थळावर पोहोचेल. त्यानंतर कथेला प्रारंभ होईल.

कथेची वेळ दुपारी २ ते साळकाळी ६ वाजता अशी राहणार आहे. १८ जानेवारी रोजी भागवत कथेचे सार, राजा परीक्षित चरित्र, ध्रुव चरित्र, २० जानेवारीला भक्त प्रल्हाद चरित्र, भगवान नरसिंह अवतार, २१ जानेवारी रोजी भगवान श्री राम अवतार, श्री कृष्ण जन्म, नंद महोत्सव, २२ जानेवारी रोजी कृष्ण बाल लीला, गोवर्धन पूजा, (अन्नकुट). २३ जानेवारीला रुक्मिणी विवाह, भागवत यज्ञ, २४ जानेवारीला सुदामा चरित्र, परीक्षित मोक्ष, श्रीमद भागवत कथा खंड. २४जानेवारीला दुपारी १ ते ४ या वेळेत महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.प्रभातफेरी दररोज सकाळी सहा वाजता मुख्य मार्गाने महाराजाच्या उपस्थितीमध्ये निघणार आहे. या कथा कार्यक्रमाकरिता मोठा कथा मंडप उभारण्यात आला आहे. कथा श्रवण करण्याकरिता येणाऱ्या महिला पुरुषांना आवश्यक त्या सुविधा प्राप्त व्हाव्या याचीही व्यवस्था आयोजकांच्या वतीने करण्यात आली आहे.आयोजित कथा सप्ताहाचा पुलगाव येथील नागरिकांनी लाभ घ्यावा, अशी विनंती माहेश्वरी मंडळ पुलगावच्या वतीने करण्यात आली आहे.

# वनविभागाने नरभक्षक वाघाला तात्काळ जेरबंद करा : अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू

## जि.प.माजी अध्यक्ष अजय कंकडालवार यांचा इशारा

**मूलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यात नरभक्षक वाघामुळे सगळीकडे दहशतीचे वातावरण पसरले असून या वाघाच्या हल्ल्यात दोन महिला ठार झाल्या अन काही इसम जखमी झाले.असे असतांना सुद्धा संबंधित विभागाची काही हालचाल करतांना दिसून येत नसून.जर संबंधित वनविभागाने त्या नरभक्षक वाघाला तात्काळ जेरबंद न केल्यास शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत तीव्र आंदोलन छेडण्याचं इशारा आविसं कॉंग्रेसचे युवा नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अजय कंकडालवार यांनी दिला आहे.मूलचेरा तालुक्यातील मथुरानगर व कोडसापूर येथील दोन महिलांवर नरभक्षक वाघाने हल्ला करून ठार केले.त्या नरभक्षक वाघामुळे मूलचेरासह परिसरातील



गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.या नरभक्षक वाघाला तात्काळ जेरबंद करणे आवश्यक आहे.यासाठी संबंधित वनविभागाने योग्य पाऊलं उचलून सायंकाळ पर्यंत वाघाचा बंदोबस्त करणारी टीम जर पोहचत नसेल तर समस्त शेतकरी व नागरिकांच्या उपस्थितीत १७ जानेवारीला सकाळी १० : ३० वाजता डी एफ ओ कार्यालय समोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जि.प.माजी अध्यक्ष अजय कंकडालवार यांनी दिला आहे.

# श्रीराम प्रतिष्ठापणा सोहळ्यासाठी आल्लापल्लीत भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

**अहेरी । प्रतिनिधी**

सर्व रामभक्तांचे लक्ष वेधलेल्या लागून राहिलेल्या २२ जानेवारी रोजीच्या अयोध्येतील राममूर्ती प्रतिष्ठापणा सोहळ्याच्या निमित्ताने आल्लापल्ली नगरी राममय होणार आहे. यानिमित्ताने कलश यात्रा, महाआरती असे विविध कार्यक्रम होणार असून, रामानामाच्या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमून जाणार आहे.

२२ जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात मूर्ती प्रतिष्ठापणा होत असल्याने आल्लापल्ली तील रामभक्तांमध्ये प्रचंड उत्साह आहे. हा ऐतिहासिक सोहळा अविस्मरणीय व्हावा याकरिता भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.आलापल्लीत श्रीराम मंदिर कमिटी तर्फे श्रीराम मंदिरात १७ जानेवारी पासून २०जानेवारी पर्यत सायंकाळी श्रीराम नाम जप यज्ञ, हनुमान चालीसा पठण,राम रक्षा पठण महाआरती ,गरबा चे आयोजन करण्यात आले आहे.२१जानेवारी सायंकाळी ४.०० वाजता सर्व मंदिरातून कलश यात्रा निधून ती श्रीराम मंदिरापर्यंत निघणार आहे .२२ जानेवारी ला सकाळी ९ ते १०:३० पर्यत अभिषेक व पूजा चे आयोजन करण्यात आले आहे. ११.०० ते १२.२० पर्यंत अयोध्येतील श्रीराम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे थेट एल.सी.डी स्क्रिनवर थेट प्रक्षेपण., १२.२० ते १२.४५ अयोध्येतील आरतीचे थेट प्रक्षेपण त्यानंतर श्रीराम मंदिर आलापल्ली येथील मंदिरात महाआरती.दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत स्थानिक भजन मंडळाचे भजन. सायंकाळी ६.०० वाजता सर्व भक्तांनी आपापले घरी दीप प्रज्वलन करून दोन दिवे श्रीराम मंदिरात दीप उत्सव करीता घेऊन येतील.सायंकाळी ७.०० वाजता श्रीरामाची आरती करून व्यापारी संघटनेच्या वतीने महाप्रसादाला सुरुवात करण्यात येईल.कार्यक्रमात आल्लापल्ली येथील मोठ्या प्रमाणावर भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन श्रीराम मंदिर कमिटी द्वारे कळविण्यात आले आहे

# विवाहीतेची रेल्वे समोर येवुन आत्महत्या;दोन चिमुकले मातृप्रेमापासुन दुरावले

**मूल । प्रतिनिधी**

शहरातील वार्ड क्रमांक ४ येथील रहीवाशी कुणाली नरेश कामडे (२६) हीने आज दुपारी ४ वा.चे सुमारास चंद्रपूर मार्गावरील रेल्वे फाटक समोर धावत्या रेल्वे समोर उडी मारुन आत्महत्या करुन जीवन संपविल्याची घटना शहरात घडली. रेल्वे स्टेशन पासुन रेल्वे फाटक हाकेच्या अंतरावर असल्याने ज्या रेल्वे खाली कुनालीने आत्महत्या केली त्या गाडीची गती घटनेच्या वेळेस हळु असल्याने कुणाली गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालय येथुन चंद्रपूर येथे नेत असताना त्यांचे निधन झाले.



मृतक कुनाली हीचे पती नरेश धान खरेदी विक्रीचा व्यवसाय करायचे तर सासरे स्थानिक सिध्दी विनायक मंदिरा समोर चहा चे दुकान चालवुन कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवायचे. कुनाली हीला ४ वर्षाचा मुलगा व १० महिन्याची मुलगी आहे. आत्महत्या चे कारण अद्याप अस्पष्ट असुन पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# गांधी सिटी पब्लिक स्कूल मध्ये हिरकणी संमेलन

**पुलगाव । प्रतिनिधी**

जय महाकाली शिक्षण संस्था द्वारा संचालीत गांधी सिटी पब्लिक स्कूल व पुलगांव पॉलिटेक्निक, पुलगांव येथे रविवार दि.१४ जानेवारीला ला मकर संक्रांति व शिक्षणमहर्षी ज्ञानयोगी प. शंकर प्रसादाजी अग्नीहोत्री यांच्या ७८व्या वाढदिवसानिमित्त हिरकणी स्नेह मिलनाचे आयोजन शाळेत करण्यात आले.ज्यामध्ये समाजामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना आमंत्रित करुन प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे व मनोरंजन पर खेळ प्रतियोगिता चे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात विविध महिला संगठन लोकमत सखी मंच, जागृती महिला मंडळ, लिनेस क्लब, माहेश्वरी समाज, जिजामाता ग्रुप कडून अँड तराड , वहीदा शेख , अँड.छाया धांदे, रेहाना शेख,झपाटे , रीना राठी, अँड.पूजा फलकें, उषा पाटिल, मंगला राठी, डाखोरे , राजश्री जमनारे, पूनम सावरकर ,यांनी सहभाग नोंदवला.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि दिप प्रज्वलीत करुन करण्यात आली.शाळेतील




विद्यार्थीनी नारीशक्ती वर आधारित गीत गाऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.उपस्थित अतिथी मधून मुख्य महिलानी आपले विचार व्यक्त करुन समाजात महिलाचे महत्त्व व मोबाईल चे होणारे दुष्यपरिणाम याबद्दल महिलाना सतर्कपण केले. शाळेचेमुख्याध्यापक धनंजय शिगंणजुडे आणि पुलगांव पॉलिटेक्निकचे प्राचार्य नाखले यांनी नारी शक्ती बद्दल आपले विचार सागून महिला ना प्रोत्साहित केले.तसेच मनोरंजनात्मक खेळामध्ये महिलासाठी उखाना , बलून और डिस्पोजल गेम, रस्सी खेच, संगीत खुर्ची इ. खेळ उपस्थित महिला साठी ठेवण्यात आले.त्यामध्ये महिलानी जास्तीत जास्त सख्या मध्ये सहभागी होवून हा कार्यक्रम यशस्वी बनवला.तसेच शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि शाळेतील विद्यार्थी नी कार्यक्रम यशस्वी बनवण्यासाठी योगदान दिले . कार्यक्रमाचे संचालन. शिक्षिका. कविता ढोक व स्वीटी गहलोत यांनी केले..

# शरद मोहोळ हत्या प्रकरणी मुख्य आरोपीला अटक;पनवेलच्या फार्महाऊसवर छापे टाकत कारवाई

**पुणे**–पुण्यातील कुख्यात गँगस्टर शरद मोहोळ हत्येप्रकरणी मुख्य आरोपी रामदास मारणे उर्फ वाघ्या आणि गुंड विठ्ठल शेलारसह इतर आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. पनवेल पोलिसांनी पनवेलमधील एका फार्म हाऊसवर कारवाई करत आरोपींना अटक केली आहे. सध्या आरोपींना पुणे पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असल्याची माहिती आहे. शरद मोहोळच्या हत्येचा कट रचण्यात रामदास मारणे उर्फ वाघ्या आणि गुंड विठ्ठल शेलारची मुख्य भूमीका आहे.दरम्यान, या हत्येप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत १३ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. ५ जानेवारी २०२४ ला पुण्यात गुंड शरद मुळची दिवसाढवळ्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर याप्रकरणी मुन्ना पोळेकरला अटक केली होती. मात्र नंतर हत्येमागचे खरा मास्टरमाईंड वेगळा कोणतरी असावा असा पोलिसांना संशय होता. आज अखेर हत्येमागील मुख्य आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.आज पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने शरद मोहोळ हत्या प्रकरणात दहा जणांना पनवेल आणि वाशीमधून अटक केली आहे. विठ्ठल शेलार, रामदास उर्फ वाघ्या मारणे यासह दहा जणांना गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून अटक केली. शेलार आणि मारणे यांचा शरद मोहोळच्या हत्येचा कट रचण्यात सहभाग असल्याच तपासात निष्पन्न झाल्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. शरद मोहोळच्या हत्येनंतर हे सर्व आरोपी पनवेल आणि वाशी भागात लपून बसले होते. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने रात्री लपलेल्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी पनवेल पोलिसांची मदत घेण्यात आली. या सर्व आरोपींना उद्या न्यायालयात हजर करण्यात येणार आहे..शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास हल्लेखोर यांनी शरद मोहोळ यास कोथरुड परिसरातील सुतारदरा मध्ये पाठलाग करत गाठले. त्यानंतर थेट हल्लेखोरांन सोबत आणलेल्या पिस्तुलमधून गोळी मोहोळ याच्या दिशेने झाडली. शरद मोहोळ यास हल्लेखोरांच्या हल्ल्यात एक गोळी शरीरावर लागली होती. त्यास उपचारासाठी सहयाद्री रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान, उपचार सुरु असताना त्याचा प्राणज्योत मालवली होती.

# अपघातमुक्त चंद्रपूरचे स्वप्न साकार करूया : ना.सुधीर मुनगंटीवार

## जनजागृती आणि शास्त्रशुध्द नियोजन करण्याच्या सूचना;रस्ता सुरक्षा अभियानाचा शुभारंभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जीवन अतिशय अमूल्य आहे. जीवापेक्षा कोणतीच संपत्ती मोठी नाही. सृष्टीच्या नियमानुसार नैसर्गिक मृत्यु सर्वांनाच आहे. मात्र अनमोल जीव निष्काळजीपणामुळे रस्ते अपघातात गमावू नका. प्रत्येक जण रस्ता सुरक्षा समितीचा सदस्य आहेत. त्यामुळे आपल्या हातून कोणतीही चूक किंवा अपघात होणार नाही, असा संकल्प करून चंद्रपूर जिल्हा अपघातमुक्त करण्यासाठी सकारात्मक जनजागृती आणि शास्त्रशुद्ध नियोजन करावे, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि पोलिस विभागामार्फत जिल्ह्यात १५ जानेवारी ते १४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ करतांना ना. मुनगंटीवार बोलत होते. मंचावर प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद मेश्राम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कल्पना चव्हाण आदी उपस्थित होते.ना. मुनगंटीवार म्हणाले, रस्ता सुरक्षा अभियान हा अतिशय महत्वाचा विषय आहे. अपघात घडणार नाही, असा संकल्प करणे गरजेचे आहे. यासाठी सतर्कता बाळगण्याची गरज आहे. केवळ शासन निर्णयाची अंमलबजावणी करून सप्ताह, पंधरवडा किंवा महिनाभर हे अभियान न राबविता ३६५ दिवस रस्ता सुरक्षा अभियान संपूर्ण जिल्ह्यात राबवावे. भविष्यात अपघात शून्यावर आणायचे असतील तर तरुणांना वाहन सुरक्षेच्या कायद्याचे ज्ञान देणे गरजेचे आहे.एखाद्याचा जीव वाचविणे हे सर्वांत पुण्याचे काम आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने अपघातप्रवण स्थळांची (ब्लॅक स्पॉट) यादी करून त्याचा आराखडा तयार करावा व शासनाकडे त्वरीत पाठवावा, असे ना. मुनगंटीवार म्हणाले. महाराष्ट्राचे वर्णन हे 'चांदा ते बांदा' असे केले जाते. त्यामुळे चांदा हाच महाराष्ट्राचा खरा चेहरा आहे. हा चेहरा



अपघातांमुळे विद्रूप होऊ नये. इतर जिल्ह्यांनी चंद्रपूरचा हेवा करावा, असे अपघातमुक्त चंद्रपूरचे नियोजन झाले पाहिजे. चंद्रपूर, बल्लारपूर व इतर ठिकाणी 'पब्लिक ड्रेस सिस्टीम'सह सीसीटीव्ही बसवावे. जिल्ह्यातील सर्व 'स्पीड ब्रेकर'वर सार्वजनिक बांधकाम विभागाने 'रेडियम' आणि बोर्ड लावावे, अशा सूचना ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, अपघात कमी करण्याच्या उपाययोजनांमध्ये चंद्रपूर जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. प्रत्येक चवथ्या मिनिटात देशात अपघातामुळे एक मृत्यु होतो. ही मनुष्यनिर्मित आपत्ती आहे. रस्ता सुरक्षेबाबत नियमांची जनजागृती आणि अंमलबजावणी ही पालकांची सुद्धा जबाबदारी आहे. अतिरिक्त पोलिस अधीक्षक रिना जनबंधू म्हणाल्या, २०२२ आणि २०२३ मध्ये ३१ डिसेंबरला चंद्रपूर जिल्ह्यात एकही अपघात आणि मृत्यु झाला नाही. बहुतांश नागरिक पोलिस दिसल्यावर हेल्मेट किंवा सिटबेल्ट लावतात. पोलिसांसाठी नव्हे तर नागरिकांनी स्वत:च्या सुरक्षेसाठी याचा वापर करावा. मनपा आयुक्त पालीवाल म्हणाले, मोबाईल आणि गाड्या अपडेट होत आहे. मात्र त्याप्रमाणे ते वाहन चालविण्याचे 'स्किल अपडेट' होणे गरजेचे आहे. कॅन्सरपेक्षा जास्त मृत्यु रस्ता अपघातात होतात. त्यामुळे या अभियानाच्या माध्यमातून जागरुक नागरिक निर्माण होणे गरजेचे आहे.

**दारुबंदीच्या काळात कमी अपघात**

अपघातांची अनेक करणे असून शकतात. मानसिक तणाव, मद्यप्राशन करीत वाहन चालविणे अशा स्वरूपात अपघातांचे विश्लेषण केले जाते. दारुबंदीच्या काळात चंद्रपूर जिल्ह्यात अपघातांची संख्या कमी होती. आता मात्र ती वाढल्याचे निदर्शनास येत आहे. मुख्य चौकात मद्यविक्रीचे परवाने दिले जात आहेत, ही शोकांतिका आहे, याबाबत पुढे असे परवाने देऊ नये, असे मत यावेळी ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केले.

**प्रभावी जनजागृतीवर भर**

रस्ता सुरक्षा अभियानात लोकांच्या हृदयाला भीडेल अशी जनजागृती करण्यात यावी. मनपा आणि जिल्हा परिषदेच्या शाळांनी रस्ता सुरक्षा अभियान या विषयावर घोषवाक्य स्पर्धा आयोजित करावी. निबंध स्पर्धा आयोजित करून उत्कृष्ट स्पर्धकांसाठी पारितोषिक ठेवावे, असे ना. मुनगंटीवार म्हणाले.

### बोर्डा ग्रामपंचायत सरपंचाच्या विरुद्ध अविश्वास ठराव पारित

# सरपंच ऐश्वर्या खामनकर यांचा तालुका महिला कॉंग्रेस अध्यक्षाचा राजीनामा



**वरोरा । प्रतिनिधी**

शहरालगत असलेल्या ग्रामपंचायत बोर्ड- सुरला येथील सरपंचा च्या विरुद्ध दहा विरुद्ध दोन मतांनी १६ जानेवारी रोज मंगळवारला अविश्वास प्रस्ताव पारित झाला.वरोरा शहरा लगत असलेली बोर्डा ग्रामपंचायत ही विकसित आणि अधिक महसूल असलेली ग्रामपंचायत मानली जाते. या ग्रामपंचायत मध्ये एकूण १३ सदस्य आहेत. २०२१ मध्ये कॉंग्रेस पक्षाच्या ऐश्वर्या वसंतराव खामनकर या सरपंच पदी विराजमान झाल्या तर उपसरपंच पदी राहुल कौतिक ठेंगणे यांची निवड झाली. त्यानंतर सातत्याने या ठिकाणी धुसपुस सुरू होती. कधी विकास कामे तर कधी आर्थिक व्यवहारांबद्दल असलेली नाराजी यामागे असल्याचे समोर आले होते. त्यानंतर राहुल ठेंगणे व इतर नऊ सदस्यांनी अविश्वासाची नोटीस तहसीलदार योगेश कोटकर यांना दिली आणि यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार ला सभा घेण्यात आली. यावेळी एक सदस्य अनुपस्थित होते. तर बारा सदस्यांपैकी दहा सदस्यांनी अविश्वासा प्रस्तावाच्या बाजूने तर दोन सदस्यांनी विरुद्ध बाजूने मतदान केल्यामुळे दहा विरुद्ध दोन अशा मतांनी अविश्वास प्रस्ताव पारित झाला.

**ऐश्वर्या खामनकर यांनी घेतली पत्रकार परिषद**

सरपंच पदाची लालसा असल्यामुळे अविश्वास प्रस्ताव पारित झाल्याचा म्हणाल्या. ग्रामपंचायत मध्ये एका माजी सरपंचांची ढवळाढवळ आणि कॉंग्रेस पक्षातील अंतर्गत कलहामुळे पराभव झाल्याचा आरोप खामनकर यांनी यावेळी केला. तसेच वरोरा तालुका महिला कॉंग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा त्यांनी चंद्रपूर जिल्हा महिला कॉंग्रेस अध्यक्ष नम्रता ठेमसकर यांचे कडे पाठविल्याचे सांगितले. पत्रकार परिषदेला ग्रामपंचायत सदस्य प्रतिमा काटकर, छाया कामडी, निता बोढाले व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. आता सरपंच पदी कोण विराजमान होते याकडे लक्ष लागले आहे.

## कवी नीरज आत्राम बंधुता काव्यप्रतिभा पुरस्काराने सन्मानित

**वरोरा । प्रतिनिधी**

बंधुता लोकचळवळीचे सुवर्णमहोत्सवी आणि राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे रोप्यमहोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद,बंधुता प्रतिष्ठान,काषाय प्रकाशन पुणे,रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, भगवान महावीर शिक्षण संस्थेचे प्रतिम प्रकाश महाविद्यालय भोसरी आणि भारतीय जैन संघटनेचे कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय वाघोली पुणे या संस्थांच्या संयुक्त विद्यमान, नुकत्याच झालेल्या २५ वे राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन एस.एम.जोशी सभागृह गांजवे चौक,नवी पेठ पुणे येथे बंधुता काव्य प्रतिभा पुरस्कार कवी नीरज महादेव आत्राम यांना संमेलनाध्यक्षा,. मधुश्री ओव्हाळ, पूर्वाध्यक्ष प्रा. शंकर आथरे, उद्घाटक डॉ. मनोहर जाधव, स्वागताध्यक्ष,प्रा. चंद्रकांत वानखेडे, स्वागताध्यक्ष डॉ. बंडोपंत कांबळे, बंधुताचार्य प्रकाश रोकडे, ( संस्थापक अध्यक्ष), प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, ( मुख्य निमंत्रक ) सूत्र संवादक संगीता झिंझुरके, या मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या आधी सुद्धा जिल्हा स्तरीय , विदर्भ स्तरीय,राज्यस्तरीय, आणि राष्ट्रीय अशा अनेक पुरस्कारांनी पुरस्कृत केले आहे. कवी नीरज आत्राम यांना बंधुता काव्य प्रतिभा पुरस्कार हा त्यांनी



दिलेल्या, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नातेवाईक,मित्रमंडळी,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार, साहित्यिक,सारस्वत यांचेकडून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ वरोरा शाखेची ची नवीन कार्यकारिणी गठित

### पत्रकार संघात नवीन सदस्यांचा समावेश;अध्यक्ष पदी प्रविण गंधारे तर उपाध्यक्षपदी ग्यानिवंत गेडाम

**वरोरा । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची जुनी कार्यकारिणी बरखास्त करून वरोरा शाखेची नवीन कार्यकारिणी घोषित करण्यात आली. वरोरा येथील डॉ. एपिजे अब्दुल कलाम , रत्नमाला चौकातील रूचिदा हॉटेल मध्ये रविवारी दुपारी १ वाजता पत्रकार संघाची सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख रविंद्र तिराणीक होते.



मार्गदर्शक म्हणून प्रदिप कोहपरे जिल्हा सचिव, प्रमुख सल्लागार म्हणून विनोद शर्मा जिल्हा उपाध्यक्ष यांची सभेला उपस्थिती होती.रविंद्र तिराणीक यांनी सभेला संघटना वाढीसाठी व पत्रकार कसा असावा याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले, तसेच पत्रकार संघांचे जिल्हा सचिव प्रदीप कोहपरे यांनी सभेचा लेखाजोखा सभाध्यक्षा समोर मांडला व नविन कार्यकारिणी घोषित केली. पत्रकार संघाचे सदस्य परमानंद तिराणीक यांना महाराष्ट्र शासनाचा जिवन गौरव पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल त्यांचा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.मागील वर्षीच्या पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी संघटना वाढीसाठी कोणत्याही प्रकारची कामे केली नाही.गेल्या वर्षभरात सदस्यांना विश्वासात घेतले नाही, किंबहुना संघाची मासिक सभा बैठका बोलावली नसल्याने पत्रकार संघाच्या कामगिरीवर ठपका ठेऊन महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख रविंद्र तिराणीक यांनी नाराजी व्यक्त करून जुनी कार्यकारिणी बरखास्त करण्याचा ठराव सर्वानुमते पारित केला व नवीन कार्यकारिणी गठित करण्यात आली. अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ वरोरा तालुका अध्यक्ष पदी प्रवीण गंधारे,सचिव पदी धर्मेंद्र शेरकुरे यांची नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी दैनिक सह्याद्रीचा राखणदारचे तालुका प्रतिनिधी ग्यानिवंत गेडाम , सहसचिव मनोज गाठले, परमानंद तिराणीक संपर्क प्रमुख, तुलसीदास आलाम प्रसिद्धी प्रमुख, मार्गदर्शक सल्लागार पदी जगदीश पेंदाम, संघटक पदी खेमचंद नेरकर , प्रशांत बदकी कोषाध्यक्ष,तर मुख्य मार्गदर्शक म्हणून राजेंद्र मर्दाने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली,नवनियुक्त पदाधिकाऱ्याचे वरिष्ठांनी पुष्प गुच्छ देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## गडचिरोलीत खळबळ! वाघाच्या हल्ल्यात आणखी एक महिला ठार;आठ दिवसांत दुसरी घटना

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या दक्षिण भागातही वाघाचे हल्ले वाढले असून मुलचेरा तालुक्यातील कोडसापूर येथे वाघाच्या हल्ल्यात आणखी एक महिला ठार झाल्याची घटना सोमवार (१५ जानेवारी) रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. रमाबाई शंकर मुंजमकर (५५) असे महिलेचे नाव आहे.प्राप्त माहितीनुसार रमाबाई शंकर मुंजमकर ह्या कोळसापुर येथील आपल्या राहत्या घरालगत कापूस वेचणी करत असताना वाघाने अचानक हल्ला करत तिला लगतच्या जंगलातच म्हणजे रेंगेवाही उपक्षेत्रातील कोपरअली



बिट मधील खंड क्रमांक १५२५ मध्ये जवळपास २०० मीटर फरफटत नेले.विशेष म्हणजे वाघाने त्या महिलेचा डावा हात पूर्णपणे खाल्ला असून मानेवर खूप मोठी जखम असल्याची माहिती मिळाली आहे. सोमवार कोपरअली येथे आठवडी बाजार असल्याने मुलगा राहुल मुंजमकर हा बाजारासाठी लगतच्या कोपरअली येथे गेला होता. आठवडी बाजार करून घरी परत आल्यानंतर त्याची आई कुठेच दिसत नसल्याने त्याने लगतच्या कापसाच्या शेतात जाऊन पाहणी केली असता रक्ताने माखलेली साडी त्याला दिसून आली. त्याची पत्नी आणि लहान मुलगी घरीच होते.मात्र याबाबत त्यांना माहितीच नाही. ही गोष्ट गावात माहीत होताच गावकऱ्यांनी शोध मोहीम राबविली असता लगतच्या जंगलात रमाबाई मुंजमकर यांचा मृतदेह आढळून आला . याची माहिती वनविभागाला मिळताच मार्कंडाचे वनपरिक्षेत्र अधिकारी भारती राऊत, क्षेत्र सहाय्यक आय पी मांडवकर आणि त्यांची चमू तसेच मुलचेरा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र वन विभाग आणि पोलिसांना वाघाच्या हल्ल्यामुळे भयभीत असलेल्या नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.विशेष म्हणजे ७ जानेवारी रोजी अहेरी वनपरिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या चिंतलपेठ येथे कापसाच्या शेतात काम करत असताना सुषमा देवदास मंडल या महिलेवर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना घडली होती. त्या अगोदर देखील मुलचेरा तालुक्यातील याच परिसरात विश्वनाथनगर आणि कोठारी येथील दोन पुरुषांवर वाघाने हल्ला केल्याची घटना घडली त्यात त्यांच्या पायाला गंभीर जखम झाली आहे.१४ जानेवारी रोजी मुलचेरा तालुक्यातील पेडीगुडम वनपरिक्षेत्रातील मथुरानगर गावातील महिला शेतात काम करत असताना त्यांना वाघाचे दर्शन झाले.महिला भयभीत झाली होती .अखेर गावकऱ्यांच्या मदतीने ती महिला गावात पोहोचली . त्यानंतर गावकऱ्यांनी त्या भागात पाहणी केली असता वाघाचे पंजे स्पष्टपणे आढळून आले. यापूर्वी पाळीव प्राण्यांवर वाघाने हल्ले करून ठार केल्याची घटना घडली. मात्र आलापल्ली वनविभाग अजूनही गाळ झोपेतच असल्यामुळे अशा घटना घडत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सध्या शेतात कापसाची वेचणी सुरू असताना येथील शेतकऱ्यांना चारही बाजूंनी पहारा देऊन काम करण्याची नामुष्की ओढवली आहे. अल्लापल्ली वनविभाग अंतर्गत येत असलेल्या अहेरी आणि मार्कंडा या दोन वनपरिक्षेत्रात दोन महिलांना जीव गमवावा लागला त्यामुळे परिसरातील नागरिकाकडून प्रचंड रोष व्यक्त केला जात आहे.

# बालमेळाव्यात विद्यार्थ्यांनी सादर केल्या लक्ष वेधून घेणाऱ्या विज्ञान प्रतिकृती

**मूल । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या मनात वैज्ञानिक भावना निर्माण व्हावी या हेतूने सुभाष उच्च प्राथमिक शाळा मूल च्या वतीने विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे उद्घाटन तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे यांच्या हस्ते पार पडले.

अध्यक्षस्थानी शाळा सल्लागार समितीचे अध्यक्ष प्रा. मारोतराव पुल्लावार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य गजानन नागापुरे, ॲड. अनंत बल्लेवार, माजी सैनिक मारोतराव कोकाटे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बंडू घेर, शाळा सल्लागार समितीचे सदस्य गिताचार्य सुखदेव चौथाले, गिताचार्य गणेश मांडवकर, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा सुवर्णा पिपरे, सहसचिव निलेश बंडावार, माता पालक संघाच्या उपाध्यक्षा इंदु मडावी, सहसचिव उषा थोराक,शाळेचे मुख्याध्यापक अविनाश जगताप, पदवीधर शिक्षक राजू गेडाम आदी उपस्थित होते.या बाल विज्ञान मेळाव्यात नर्सरी ते इयत्ता ८ वी च्या ७७ विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला. यात भूकंपापूर्वी धोक्याचे पूर्वसूचना देणारे यंत्र, वॉटर अलार्म, स्मोक अब्सझार्क यंत्र, डिजे निर्मिती, शेती लागवड व सरक्षण , ट्रेन सिक्रुरीटी, शेती सुरक्षा यंत्र ,संगणकाच्या सहाय्याने जोडणारे टॉपोयंत्र आदी मॉडेल सादर करून सर्वाचे लक्ष वेधून घेतले. या मॉडेलचे परीक्षण सचिन बल्लावार, मुकेश मॅकलवार, शैलेश देवाडे यांनी केले.विद्यार्थ्यांनी तयार केलेले मॉडेल बघण्यासाठी पालक व नागरिकांनी एकच गर्दी केली होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक राहुल मुंगमोडे, योगेश पुल्लकवार, बंडु अल्लीवार, रिना मसराम, अजय राऊत, सचिन चिमुरकर, सुकेशीनी रामटेके, निखिता पोहणे, संध्या आभारे, निशा जगताप, चित्रा फलके, आदींनी परिश्रम घेतले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .